**ठळक बातम्या**

- राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे पिकांचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- आखातातल्या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर ८ दशांश टक्के कमी होईल असा मूडीजचा अंदाज

- ईस्टरचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा

- महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचं लखनौ सुपर जायंट्सपुढं विजयासाठी १५७ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

राज्यात गेल्या आठवड्यात अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे पीकांचं नुकसान झालं आहे. नियमानुसार या शेतकऱ्यांना शासनाकडून आवश्यक ती भरपाई देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिली. नाशिकमध्ये अखिल भारतीय संत संमेलनाच्या कार्य समितीच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. अवकाळी पावसामुळे नुकसानीचे पंचनामे केले जात असून त्याचा अहवाल आल्यानंतर भरपाई दिली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं जाणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

नाशिकमधल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाची चौकशी वेगानं सुरू आहे. विशेष चौकशी पथकाला यासंदर्भात अनेक प्रकारची माहिती मिळाली आहे. त्या आधारे बनावट खात्यांद्वारे झालेल्या उलाढालीची तपासणी सक्तवसुली संचलनालयातर्फे केली जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. खरात प्रकरणाचे सीडीआर राजकीय व्यक्तींकडे कसे पोहोचले याची चौकशीही केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

त्र्यंबकेश्वरमधे पुढल्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामं केली जात आहेत. गोदावरी नदीचं शुद्धीकरणं करणं, त्र्यंबकेश्वर इथं गोदावरीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेतला आहे, नाशिकमध्ये साधुग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशातल्या अनेक राज्यांमधे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्याचे निर्देश केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिले आहेत. अतिवृष्टी आणि गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीविषयी चौहान आज संबंधित राज्यांच्या कृषी मंत्र्यांशी चर्चा करुन आढावा घेत आहेत.

<><><><><>

मूडीज या पतमानांकन संस्थेनं चालू आर्थिक वर्षासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यावरुन ६ टक्क्यापर्यंत खाली आणला आहे. पश्चिम आशियात सध्या सुरु असलेल्या संघर्षामुळे आर्थिक वृद्धीची गती मंदावेल आणि महागाईत वाढ होईल, असा अंदाज मूडीजनं वर्तवला आहे. या युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यात घट होऊन नजीकच्या काळात घरगुती पातळीवर त्याचा तुटवडा होईल, इंधनाच्या किंमतीत वाढ होऊन वाहतूक खर्चात देखील वाढ होईल, तसंच अन्नधान्याचे दरही वाढतील असं मूडीजनं आपल्या अहवालात म्हटलं आहे.

भारताच्या, कच्च्या तेलाच्या एकूण आयातीपैकी ५५ टक्के, आणि एलपीजीची ९० टक्के आयात पश्चिम आशियातून केली जाते.

<><><><><>

प्रदेश काँग्रेसनं पक्षाच्या बांधणीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी संघटन सृजन अभियान सुरु केलं असून त्याद्वारे पहिल्यांदाच तालुका अध्यक्षांची निवड करण्यात येणार आहे. पक्षाच्या संघटनात्मक बांधणी संदर्भात अनेक कार्यकर्ते आणि नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. याद्वारे संपूर्ण राज्यात ७२ जिल्हा अध्यक्ष आणि ६७५ तालुकाध्यक्षांची निवड केली जाणार आहे. तालुकाध्यक्षांबरोबरच काँग्रेसच्या इतर दहा संस्थांसाठीच्या तालुकास्तरीय अध्यक्षांचीही निवड केली जाणार आहे.

**<><><><><>**

बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीतल्या घटक पक्षांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून महाविकास आघाडीतल्या पक्षांनीही सामंजस्याची भूमिका घेण्याचं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी आज केलं. ते सोलापूर इथे दौऱ्यावर आले होते, तिथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सोमवारी बारामती विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठी अर्ज भरणार आहेत. अजित पवार यांच्या अपघातानंतर बारामतीची पोटनिवडणूक अत्यंत संवेदनशील परिस्थितीत होत आहे. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आपली इच्छा आहे, असंही तटकरे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

जगभरात आज ईस्टरचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वेटिकन सिटीमध्ये पोप लिओ चौदावे यांनी काल बेसिलिका मध्ये ईस्टर प्रार्थना केल्यानंतर जगभरात ईस्टर सणाला सुरुवात झाली.

पोप यांनी जागतिक पातळीवरच्या अशांततेच्या वातावरणात शांततेसाठी आणि बंधुत्वासाठी प्रार्थना केली. अमेरिका-इस्रायल - इराण, आणि रशिया- युक्रेन यांच्यातल्या संघर्षाचा आपल्या भाषणात उल्लेख करत, त्यांनी जगात शांतता नांदावी अशी प्रार्थनाही या निमित्तानं केली. प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचं याच दिवशी पुनरुथ्थान झाल्याच्या आनंदाप्रित्यर्थ हा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस सत्य, त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनीही ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ख्रिस्ती धर्मियांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद, उत्साह आणि आशा निर्माण करो असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही ईस्टरनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यात अनेक ठिकाणी आज चर्चमधे आज विशेष प्रार्थना आणि प्रवचनांचं आयोजन करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज बिनविरोध निवड झाली. बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्यानं  निवडणूक बिनविरोध झाली. खो-खो संघटनेत अनेक वर्षांनी हा सन्मान एका महिलेला मिळाला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सनरायझर्स हैदराबादनं  लखनौ सुपर जायंट्सपुढं विजयासाठी १५७ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. लखनौ सुपर जायंटसनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, तो अचूक ठरला. सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. ८ व्या षटकातच त्यांची स्थिती ४ बाद २६ धावा अशी झाली. त्यानंतर हेन्रीच क्लासन आणि नीतीशकुमार रेड्डी यांनी डाव सावरला. क्लासननं ६२, तर रेड्डीनं ५६ धावा केल्या. मात्र हे दोघं बाद झाल्यानंतर सनरायझर्स हैदराबादचा डाव निर्धारित २० षटकात ९ बाद १५६ धावांवर संपला. लखनौ सुपर जायंट्सतर्फे महंमद शामी, प्रिन्स यादव आणि आवेश खान यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंटसच्या १९ षटकात ५ बाद १४८ धावा झाल्या होत्या.

आजचा दुसरा सामना बंगळुरू इथे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होत आहे. थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा ससामना सुरु होईल. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाच्या संघाने पात्रता फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

नागपूरमध्ये आजपासून १७ वर्षांखालच्या मुला-मुलींसाठीची सातवी राष्ट्रीय कनिष्ठ गट मुष्टियुद्ध स्पर्धा सुरू झाली. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं. येत्या ११ तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातून सुमारे ६०० मुष्टियोद्धे सहभागी होत आहेत. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची १७ वर्षांखालील भारतीय संघात निवड करण्यात येईल.

<><><><>

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कायाकिंग या जलक्रीडा स्पर्धेला आज सांगली इथे प्रारंभ झाला. या स्पर्धेचं उद्घाटन राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री आणि सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं.

<><><><>

लातूरहून मध्य प्रदेशातल्या बुऱ्हाणपूरकडे ३६ लाख रुपये किमतीच्या चंदनाच्या तस्करीचा प्रकार नांदेडच्या विशेष पोलीस पथकानं हाणून पाडला. एका वाहनात वेगवेगळे कप्पे करून या चंदनाची तस्करी केली जात होती. या कारवाईत १ हजार ४७० किलो चंदन, वाहन आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या गव्हाणवाडी परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं विमान इंधन चोरीचा प्रकार उघडकीला आणला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून मुख्य सूत्रधार अद्याप फरार आहे. पोलीस पथकानं त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकत इंडियन ऑइल कंपनीच्या टँकरमधून विमान इंधनाची चोरी करणाऱ्या तिघांना रंगेहाथ पकडलं. हे सर्वजण या विमान इंधनाची विक्री काळ्या बाजारात करणार होते

<><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//